Historicity Research Journal | Impact Factor : 0.4521(UIF)
Volume 2 | Issue 5 | Jan 2016 | ISSN:- 2393-8900

Research Article

# स्वराज्यनिष्ठ श्रीमंत सरदार चांदजीराव पाटणकर

**प्रा.डॉ. विश्वनाथ पवार**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

**प्रस्ताविक :**

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्यात पाटणकर देशमुखांनी महत्त्वाचे सहकार्य दिले आहे. छ. संभाजी राजांच्या हत्येनंतर स्वराज्यावर आलेल्या अभूतपूर्व संकटात पाटणकर घराणे स्वराज्यनिष्ठ राहिले छ. राजाराम महाराज जिंजीच्या वेढ्यात अडकले असता सरदार चांदजीरावांनी मुघल फौजांशी सातत्याने संघर्ष केला. स्वराज्य रक्षणार्थ त्यांनी दिलेले योगदान गौरवास्पद आहे. पाटणकर देशमुख—साळुंखे उर्फ पाटणकर घराण्याची उत्पत्ती प्राचीन राजवंश चालुक्यापासून सुरू होते. सध्याच्या पाटणकरांच्या इतिहासाला ज्ञात असणारा मूळपुरुष ज्योत्याजीराव साळुंखे होय. त्यांनी मोठ्या पराक्रमाने आदिलशाही राजवटीत पाटण परगण्यांची देशमुखी प्राप्त केली. सन १६५९ साली अफझलखान वधानंतर पाटण परगणा स्वराज्यात समाविष्ट झाला. शिवकालखंडात यशवंतराव, बाळाजीराव व चांदजीराव यांनी आपल्या पराक्रमाचा ठसा उमटविला. सरदार चांदजीराव पाटणकर हे पाटणकर घराण्यातील अत्यंत कर्तबगार व स्वराज्यनिष्ठ सरदार होत. शिवकालीन कागदपत्रे व श्रीमंत सरदार पाटणकर कुळाचा इतिहास व त्यांच्या ऐतिहासिक कागदपत्रावरून सन१६७८ ते १७००पर्यंतचा सरदार चांदजीरावांचा इतिहास ज्ञात होतो.

**सरदार चांदजीरावांचा फिसाहतखोरास कोटगा:**

छ. संभाजी राजांच्या अमानुष हत्येनंतर स्वराज्य अडचणीत आले. किल्ल्या मागून किल्ले प्रदेशामागून प्रदेश शत्रूच्या ताब्यात जाऊ लागला. स्वराज्यातील अनेक सरदार केवळ वतनासाठी मुघलांच्या सेवेत रुजू होऊ लागले. अशा अडचणीच्या प्रसंगी सरदार पाटणकर त्यांची सेना छातीचा कोट करून स्वराज्य रक्षणार्थ छत्रपतींच्या पाठीशी उभी ठाकली. वाई, प्रतापगड पर्यंतच्या प्रदेशात अनेक वतनदार फिसाहतखोर (बंडखोर) तयार झाले होते. त्यांना चांदजीरावांनी शिक्षा देऊन वठणीवर आणले.

सरदार पाटणकरांच्या पराक्रमाच्या वार्ता पन्हाळ्यावर असणाऱ्या छ. राजाराम महाराजांना समजल्या त्यांना आनंद झाला. त्यांनी दि १२ /०९/१६८९ रोजी सरदार पाटणकरांचा बहुमान करणारे पत्र पाठविले. त्यातील मजकूर पुढील प्रमाणे ‘‘तुम्ही हुशार खबरदार राहून फीसाहतखोरास कोटगा देऊन मार्ग मामला अनुकूल चालता केला यावरूनस्वामी तुम्हावरी संतोष पावले. तरी तुम्ही मर्दनिलोक तैसेच आहा. तुमचा भरवसा आहे. हे मराठे राज्य, तुम्ही आम्ही मऱ्हाटे लोकी इमानासी खता न करिता मऱ्हाठेधर्माची इरे धरून स्वामी कार्य करावे.ऐसे इकडून तुम्हा लोकांचे उर्जितच आहे.’’[१]

**गनिमास दहशत लावून गर्देश मेलवणे:**

मुघलांच्या सततचा पाठलागामुळे छ.राजाराम महाराज जिंजी किल्ल्याच्या आश्रयास गेले इकडे महाराष्ट्रात बादशहा औरंगजेबाने आपल्या सरदारांच्या माध्यमातून किल्ल्यांना वेढा देण्याचा व प्रदेश जिंकण्याचा सपाटा लावला होता. औरंगजेब विजापूरला आला असल्याच्या पार्श्वभूमीवर छ.राजारामांनी जिंजीहून दि १३ एप्रिल १६९० रोजी सरदार चांदजीराव पाटणकर सरदारांना पत्र पाठवून कळविले आहे की संताजी घोरपडे व धनाजी जाधव या सरदारांच्या बरोबर विजापूरवर चालून जाण्याची व सर्वांनी मिळून गनिमास दहशत लावून गर्देश मिळवण्याचा आदेश दिला आहे. छ. राजाराम महाराज पत्रामध्ये म्हणतात की,''ऐशा प्रसंगी संताजी घोरपडे व धनाजी जाधव व अवघे सरदार मिळोन पोख्त जमावानिशी विज्यापूरीजावे. देश मारून तलफ करावा. फावल्या प्रसंगी शहरावर छापा घालावा. औरंगशहास दहशत लावावी. याकरिता संताजी घोरपडे व धनाजी जाधव या उभयतांस पत्रे पाठविली आहेत. तेणे प्रमाणे ते जमावानिशी विज्यापूर प्रांते स्वारीस जातील तुम्हीही त्याबरोबर आपल्या जमावाने आणि उभयतांच्या मते स्वारीशिकारी करून गनिमास दहशत लावून काबूत सापडल्या मारून गर्देश मेलवणे.''[२]

**सेनापंचसहस्त्री चांदजीराव पाटणकर:**

छ.राजाराम महाराजांनी चांदजीराव पाटणकरांना 'सेनापंचसहस्त्री' असे संबोधले आहे. सप्टेंबर १६८९ ते १६९० या अवघ्या सहा महिन्याच्या कालखंडात चांदजीरावांनी एवढी कामगिरी करून दाखविली की, त्यांना 'सेनापंचसहस्त्री' हा सेनेमधील अत्युच्च मानाचा व अधिकाराचा हुद्दा बहाल करण्यात आला. प्रस्तुत पत्रामध्ये संताजी आणि धनाजी या दोघांचाही उल्लेख 'सेनापंचसहस्त्री' असाच केला गेला आहे.[३]

**गनिमांना गर्देशमेळविले:**

स्वराज्याच्या अस्तित्वाची कसोटी लागली असताना चांदजीरावांनी संताजी व धनाजी या सेनानींच्या सोबत राहून शत्रु फौजांचा धुव्वा उडविला, मुघलांना सळो कि पळो करून सोडले. मुघल लष्कराला मराठा सैन्य म्हणजे भूतखाना वाटू लागला. गनिमांच्या फौजा मराठ्यांनी मारल्या व मराठ्यांचे राज्य जिंकणे सोपे नाही हे मराठ्यांनी दाखवून दिले. दि. ९ जून १६९० च्या एका पत्रातील खुलासा सांगतो की,''पाटणकरांनी गनिमांच्या फौजा मारून गर्देस मेळविले. दलमेहनत खस्त जाहले. पाटणकरांनी जमाव केला. त्यासी सौदागराचे कर्जे घेतली आणि आपली हिसात तमाम जमावाचे भरीस घालून, मामला राखोन राज्य रक्षावयाची मदत केली.''[४]

**पाटण परगण्यातील बारा गावे इनाम:**

वाई, जावळी, प्रतापगड, सातारा, पाटण, कराड, शिराळा हे सरदार पाटणकरांच्या लष्करी हालचालींचे मुख्य क्षेत्र होते. आणि छ. राजाराम महाराजांच्या कालखंडात मुघल मराठा संघर्षाचे हे प्रमुख केंद्र झाले होते. घेरादातेगड, गुणवंतगड या किल्ल्यांचा सन १६८९ मधील काही महिन्यांचा अपवाद वगळता हे गडकिल्ले कधीही मुघलांच्या ताब्यात गेले नाहीत. हे सरदार पाटणकरांच्या मर्दुमकी मुळे घडून आले. नागोजीराव पाटणकर आणि चांदीचीराव पाटणकर यांच्या शौर्यावर आणि स्वराज्य रक्षणासाठी त्यांनी घेतलेल्या अविरत परिश्रमामुळे छ. राजाराम महाराज अत्यंत संतुष्ट झाले. त्यांनी पाटण परगण्यातील १२ गावे त्यांना इनाम म्हणून दिली. याबाबतचे पत्र प्रल्हाद निराजी यांनी पाठविले असून हुकतमतपन्हा रामचंद्रपंताच्या माध्यमातून सदर गावे इनाम दिल्याचे दिसते.[५]

**सरदार चांदजीरावांना छत्रपतींकडून हत्ती भेट:**

सरदार चांदजीराव पाटणकर यांनी सरदार रामराव पाटणकरांकडे पंचहजारी फौज असल्याने त्यांना पंचहजारी घोड्यांचा सरंजाम बाळगण्याचा अधिकार मिळावा अशी मागणी छ. राजाराम महाराजांकडे केली होती. महाराजांनी सरदार पाटणकरांच्या शौर्याची दखल घेऊन याची अंमलबजावणी करण्याचे आदेश रामचंद्रपंतांना दिले. याच पत्रात छत्रपतींनी सरदार चांदजीरावांना एक हत्ती भेट दिल्याचे लिहिले आहे.[६] यावरून छत्रपतींकडून सरदार चांदजीरावांना मिळणारे अधिकार व सन्मान लक्षात येतो.

**गोमटे करणे हेच स्वामीस अगत्य:**

छ. राजाराम महाराज यांच्या आदेशानुसार सरदार चांदनीरावांना जिंजीला बोलाविण्यात आल्याचे दिसून येते. तर दि. २८ मे १६९३ च्या पत्रात संताजी आणि धनाजी या महान सेनानींमध्ये सरदार चांदजीरावांनी समेट घडवून आणल्याचा उल्लेख आहे.[७]रामचंद्रपंत अमात्यांनी व्याघ्रगडचा किल्लेदार त्र्यंबक कृष्ण यांस लिहिलेल्या पत्रात पाटण परिसरातील ५७ गावांचा तपशील दिला आहे. यातील ३४ गावे सरदार चांदजीरावांना इनाम वहिवाटीसाठी दिल्याचे यात नमूद केले आहे.[८] संताजीने कांचीपुरमजवळ मुघल सेनानी अलिमर्दानखानास पराभूत केले. तर धनाजींनी जिंजीस वेढा देऊन बसलेल्या इस्माईलखान मखा या सेनानीस कैद केले. या मोहिमेत सरदार चांदजीराव पाटणकरांनी पराक्रम गाजविला आहे. दि.३०/४/१६९३ च्या रामचंद्रपंत अमात्यांना पाठविलेल्या आज्ञापत्रात छ. राजाराम महाराजांनी सरदार चांदजीराव यांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले आहे की,‘‘राजश्री चांदजीराऊ पाटणकर यांनी स्वामींची सेवा एकनिष्ठेने आज अखेर केली आणि पुढेही करीत आहेत. यांचे सर्व प्रकारे चालविणे **‘गोमटे करणे हे स्वामीस अगत्य’** याकरिता स्वामींनी यांस पाटणमहाल ईनाम करून दिल्हा आहे, आणखी कित्येक सरंजाम करून दिल्हा आहे.’’[९]

**सातारा किल्ल्याचा वेढा:**

बादशहा औरंगजेबाने दिनांक ८ डिसेंबर १६९९ रोजी सातारा किल्ल्याला वेढा घातला. पुढे दि. २१ एप्रिल १७०० रोजी सातारचा किल्ला घेण्यात औरंगजेब यशस्वीझाला. या काळात मराठा सरदार वेढ्यात ढील येण्यासाठी बाहेरून हल्ले करत होते.ठिकठिकाणची शत्रूची सामुग्री नष्ट करत होते. याबाबत दि. १४ एप्रिल १७०० रोजीच्या पत्रात परशुराम त्र्यंबक यांनी सरदार चांदजीराव पाटणकरांनी कुसवडे गावी येऊन मुघलांची सामुग्री उध्वस्त केल्याबद्दल समाधान व्यक्त केले होते.[१०]

**सारांश :**

वाई, जावळी, प्रतापगड, सातारा, पाटण, कराड, शिराळा हे सरदार पाटणकरांच्या लष्करी हालचालींचे मुख्य केंद्र होते. सरदार पाटणकरांनी गनीमांच्या फौजा मारल्या, बंडखोरांना वटणीवर आणले. थोडक्यात सरदार चांदजीराव पाटणकर यांचे स्वराज्याप्रती असणारे निस्सिम प्रेम, स्वराज्य रक्षणार्थ त्यांनी दिलेले योगदान छत्रपतींनी त्यांचा केलेला सन्मान इत्यादी बाबी ऐतिहासिक कागदपत्रामधून स्पष्ट होतात.

**संदर्भसूची —**

१. शिवकालीन कागदपत्रे पृ. १७७ पत्रक १०८
२. कित्ता पृ. १७९, १८० पत्र क्र. १०९
३. पवार जयसिंगराव, मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली पृ.१६०
४. श्रीमंत सरदार पाटणकर कुळाचा इतिहास व ऐतिहासिक कागदपत्रे पृ.२२२

५. शिवकालीन कागदपत्रे पृ. १८१, पत्रक ११०
६. कित्ता पृ.१८२, पत्रक ११७
७. कित्ता पृ.११८,१८९,१९० पत्र क्र.११६
८. श्रीमंत सरदार पाटणकर कुळाचा इतिहास.... कागदपत्रे पृ. २३३
९. शिवकालीन कागदपत्रे. पृ.१९६, पत्र क्र.१२२